जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 OCT 2024
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या लोकस्मृती वसतिगृहासाठी प्रा. आर.के. पुरी यांच्या स्मरणार्थ पाच लाख रुपयांचा धनादेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना डॉ. विजया पुरी. यावेळी शेजारी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. जे.बी. यादव उपस्थित होते.

# प्रा. पुरी यांच्या स्मरणार्थ वसतिगृहासाठी पाच लाख

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाच्या प्रस्तावित लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी विद्यापीठातील माजी प्राध्यापक डॉ. आर.के. पुरी यांच्या स्मरणार्थ पाच लाख रुपयांच्या निधीचा धनादेश त्यांच्या पत्नी प्रा. विजया पुरी यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला.

विद्यापीठाने लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृह हा सुमारे शंभर विद्यार्थिनींच्या निवास व्यवस्थेसाठीचा प्रकल्प प्रस्तावित केला आहे. हे वसतिगृह लोकांच्या सहभागातून उभारावे आणि त्यातून लोकांच्या स्मृती जतन केल्या जाव्यात, अशा हेतूने विद्यापीठाने या वसतिगृहाची संकल्पना मांडली. लोकांनी आपले कुटुंब, आप्तस्वकीय यामधील प्रिय व्यक्तीच्या नावे ठराविक निधी विद्यापीठाकडे द्यावयाचा आणि त्या व्यक्तीच्या नावे निवासी खोल्यांची उभारणी करावयाची, अशी ही संकल्पना आहे.

'डॉ. पुरी यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त विद्यापीठाच्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी देणगी देण्याचा निर्णय आम्ही कुटुंबीयांनी घेतला. या माध्यमातून विद्यापीठाच्या परिसरात डॉ. पुरी यांच्या स्मृती चिरंतन राहतील,' अशी भावना डॉ. विजया पुरी यांनी व्यक्त केली. त्यांच्या या हृद्य भावनांचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी स्वागत केले. लोकस्मृती वसतिगृहाच्या संकल्पनेमागे दात्यांच्या आणि त्यांच्या आप्तेष्टांच्या स्मृती जपणे हीच भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. जे. बी. यादव उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 OCT 2024
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या लोकस्मृती वसतिगृहासाठी प्रा. आर. के. पुरी यांच्या स्मरणार्थ पाच लाख रुपयांचा धनादेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना डॉ. विजया पुरी. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. जे. बी. यादव. (छाया : नाज ट्रेनर)

# लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी प्रा. पुरी यांच्या स्मरणार्थ पाच लाखांचा निधी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्रस्तावित लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी विद्यापीठातील माजी प्रा. डॉ. आर. के. पुरी यांच्या स्मरणार्थ पाच लाख रुपयांच्या निधीचा धनादेश त्यांच्या पत्नी प्रा. विजया पुरी यांनी नुकताच कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. हा सुमारे शंभर विद्यार्थिनींच्या निवास व्यवस्थेसाठीचा प्रकल्प आहे. डॉ. पुरी यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त वसतिगृहासाठी देणगी देण्याचा निर्णय कुटुंबीयांनी घेतला. या माध्यमातून विद्यापीठ परिसरात डॉ. पुरी यांच्या स्मृती चिरंतन राहतील, अशी भावना डॉ. विजया पुरी यांनी व्यक्त केली. त्यांच्या हृद्य भावनांचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी स्वागत केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. जे. बी. यादव उपस्थित होते.

21 OCT 2024
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी ५ लाखांचा निधी

## डॉ. आर. के. पुरी यांच्या स्मरणार्थ कुलगुरूंकडे धनादेश सुपूर्द

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्रस्तावित लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी विद्यापीठातील माजी प्राध्यापक डॉ. आर. के. पुरी यांच्या स्मरणार्थ ५ लाखांच्या निधीचा धनादेश त्यांच्या पत्नी प्रा. विजया पुरी यांनी नुकताच कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला.

शिवाजी विद्यापीठाने लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृह हा सुमारे शंभर विद्यार्थिनींच्या निवास व्यवस्थेसाठीचा प्रकल्प प्रस्तावित केला आहे. हे वसतिगृह लोकसहभागातून उभारावे आणि त्यातून लोकांच्या स्मृती जतन केल्या जाव्यात, अशा हेतूने विद्यापीठाने या वसतिगृहाची संकल्पना मांडली.



कोल्हापूर : लोकस्मृती वसतिगृहासाठी प्रा. आर. के. पुरी यांच्या स्मरणार्थ पाच लाखांचा धनादेश कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना डॉ. विजया पुरी. सोबत प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील व डॉ. जे. बी. यादव.

डॉ. पुरी यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त विद्यापीठाच्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी देणगी देण्याचा निर्णय आम्ही कुटुंबीयांनी घेतला असून, या माध्यमातून विद्यापीठाच्या परिसरात डॉ. पुरी यांच्या स्मृती चिरंतन राहतील, अशी भावना डॉ. विजया पुरी यांनी यावेळी बोलताना व्यक्त केल्या. त्यांच्या या हृद्य भावनांचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी स्वागत केले. लोकस्मृती वसतिगृहाच्या संकल्पनेमागे दात्यांच्या आणि त्यांच्या आप्तेष्टांच्या स्मृती जपणे हीच भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. जे. बी. यादव उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 OCT 2024
पुण्यनगरी

# संशोधकाने संशोधनाचे केंद्रबिंदू बदलत राहिले पाहिजे : डॉ. शिर्के

**कोल्हापूर :** संशोधन हे पुढच्या पिढीने संदर्भ म्हणून वापरले पाहिजे, एवढे ते दर्जेदार झाले पाहिजे. संशोधनात संशोधकाचे वाचन, चिंतन आवश्यक आहे. त्यासाठी संशोधकाने संशोधनाचे केंद्रबिंदू बदलत राहिले पाहिजे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग आयोजित पीएच.डी. मार्गदर्शक आणि विद्यार्थी मार्गदर्शन कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी प्रा. रणधीर शिंदे यांनी शिवाजी विद्यापीठातील पूर्व संशोधनाचा आढावा घेत संशोधनाची परंपरा सांगितली, तर प्रास्ताविकात विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी या कार्यशाळेमागची भूमिका मांडली.

कार्यशाळेमध्ये डॉ. प्रभाकर देसाई, डॉ. अनिल गवळी, डॉ. गोविंद काजरेकर, डॉ. गोमटेश्वर पाटील या मार्गदर्शक वक्त्यांनी संशोधनाची दृष्टी विविध परिप्रेक्ष्य, संशोधनाचे आंतरविद्याशाखीय स्वरूप, प्रबंध मांडणी : शिस्त आणि नैतिकता, प्रबंध विषय : जबाबदारी आणि आवश्यक काळजी, संशोधन साधने वापरण्याचे कौशल्य या विषयांच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 OCT 2024
पुढारी

# विद्यापीठात आज काळसेकर पुरस्कार वितरण समारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा २०२४ चा सतीश काळसेकर काव्य पुरस्कार वितरण समारंभ सोमवार, दि. २१ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित केला आहे.

वि. स. खांडेकर भाषाभवन येथे होणाऱ्या कार्यक्रमात ज्येष्ठ कवयित्री अनुराधा पाटील यांना, तर ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्काराने वीरधवल परब यांना सन्मानित केले जाईल. जेष्ठ साहित्यिक भारत सासने, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुरस्कार वितरण केले जाणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन मराठी विभागप्रमुख प्रा. नंदकुमार मोरे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 OCT 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज विशेष व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने बीबीसी मराठीचे संपादक अभिजित कांबळे यांचे सोमवारी (दि. २१) दुपारी २ ते ४ या वेळेत विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. 'माध्यमांची विश्वासार्हता' या विषयावर ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. व्याख्यान सर्वांसाठी खुले असून विद्यार्थी, नागरिक, पत्रकारांनी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 OCT 2024
पुढारी

# फूड टेक्नॉलॉजी विभागात जागतिक अन्नदिन

**कोल्हापूर :** फूड टेक्नॉलॉजी विभाग, कॉलेज ऑफ नॉन-कन्व्हेंशनल व्होकेशनल कोर्सेस फॉर वूमन येथे जागतिक अन्न दिन साजरा करण्यात आला. जागतिक अन्न दिन दरवर्षी १६ ऑक्टोबर रोजी साजरा करण्यात येतो. जागतिक अन्न दिनाच्या निमित्ताने रील, क्वीझ, पॅकेजिंग अँड लॅबेल्लिग फॉर इंनोवेटिव्ह फूड प्रॉडक्ट्स, वॉल पेपर डिस्प्ले, लोगो डिझाईन स्पर्धा झाल्या. उद्घाटन मॅनॅजमेन्ट रिप्रेसेंटेटिव्ह डॉ. ए. आर. कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. प्रत्येकाने अन्नाची नासाडी थांबवण्यासाठी प्रयत्न केले तर संयुक्त राष्ट्राने केलेले शून्य भूकेचे उद्दिष्ट गाठणे शक्य होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन विभाग प्रमुख डॉ. नीलम जिरगे यांनी केले. प्रा. श्वेता शहा यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
21 OCT 2024 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बायोमासपासून उपयुक्त संयुगांची निर्मिती

## शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांना आंतरराष्ट्रीय यूके पेटंट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधकांनी बायोमासपासून औषधनिर्माण क्षेत्रासाठी उपयुक्त संयुगांची निर्मिती करण्यात यश मिळविले आहे. त्यांच्या संशोधनाला यूकेचे पेटंट मिळाले आहे. प्रतिजैविके व कर्करोगावरील चाचण्यांमध्ये त्यांचे उपयोजन शक्य आहे.

रसायनशास्त्र अधिविभागातील डॉ. शंकर हांगिरगेकर, अक्षय गुरव व ललित भोसले या संशोधकांनी ग्राइंडस्टोन केमिस्ट्री वापरुन बायोमासपासून हायड्रॉक्झी मिथाईल फुरफुराल हे मूलद्रव्य वापरून नवीन हायड्राझिनिल थायाझोल संयुगे तयार करण्याची पद्धती शोधली आहे. या संयुक्त राष्ट्रांचे प्रतिष्ठित पेटंट मिळाले आहे. संशोधनात नवीन हायड्राझिनिल थायाझोल संयुगे तयार करण्यासाठी ग्राइंडस्टोन केमिस्ट्री सोप्या व पर्यावरणपूरक पद्धतीचा वापर केला आहे. पद्धती कोणत्याही उत्प्रेरकाचा किंवा द्रावणाचा वापर न करता कमी वेळेत उत्कृष्ट उत्पादन मिळवता आले. हे संशोधन औषधनिर्माण क्षेत्रासाठी अभिनव ठरले असून पर्यावरणपूरक रसायनशास्त्रातील महत्त्वाचा टप्पा असल्याचे मत डॉ. हांगिरगेकर यांनी व्यक्त केले.



डॉ. हांगिरगेकर



अक्षय गुरव



ललित भोसले

### अँटी-ऑक्सिडंट व अँटी-कॅन्सर चाचण्यांसाठी उपयोग

पर्यावरणपूरक दृष्टिकोनातून, रासायनिक प्रक्रिया अधिक शाश्वत करण्यासाठी ५ हायड्रॉक्सी मिथाइल फुरफुरालसारख्या बायोमास-आधारित संयुगांचा वापर करणे महत्त्वाचे ठरत आहे. त्यापासून तयार केलेल्या हायड्राझिनिल थायाझोल रसायनाचा संशोधन क्षेत्रात अँटी-बॅक्टेरियल, अँटी-ऑक्सिडंट व अँटी-कॅन्सर चाचण्यांसाठी उपयोग झाला आहे. हायड्राझिनिल थायाझोलचे संशोधन औषध उत्पादनात मोठ्या प्रमाणात उपयोगी ठरले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 OCT 2024
लोकमत

# संघर्षकाळात पीचवर टिकणे महत्त्वाचे : जाधव

## 'तेंडल्या' चित्रपटाच्या स्क्रीनिंगला प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** स्वप्नांच्या मागे धावताना संघर्ष काळात अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्याला धीराने सामोरे जावे लागते. या काळात सचिन तेंडुलकरसारखे पीचवर टिकून राहणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन 'तेंडल्या' चित्रपटाचे दिग्दर्शक सचिन जाधव यांनी शनिवारी केले.

शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागाच्या बी. ए. फिल्म मेकिंग कोर्सच्या वतीने 'तेंडल्या' चित्रपटाचे स्क्रीनिंग केले. यावेळी प्रेक्षकांशी त्यांनी संवाद साधला.

जाधव म्हणाले, चित्रपट निर्मिती हे टीमवर्क आहे. कथा सांगताना ती छोटी किंवा मोठी नसते, तर ती नीट अभिव्यक्त करणे गरजेचे असते. त्यात सातत्य ठेवावे लागते.

मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत केले. कोल्हापुरातील चित्रपट दिग्दर्शक उमेश बगाडे, मयूर कुलकर्णी, डॉ. संजय तोडकर, चित्रपट परीक्षक डॉ. अनमोल कोठाडीया, मराठी विभागाचे माजी प्रमुख आणि ज्येष्ठ लेखक प्रा. डॉ. राजन गवस, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे सचिव डॉ. शशिकांत चौधरी, प्रा. विकास कांबळे, प्रा. डॉ. प्रकाश पवार उपस्थित होते. साक्षी वाघमोडे हिने सूत्रसंचालन केले. अनुप जत्राटकर यांनी आभार मानले.

21 OCT 2024

हॅलो प्रभात

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संघर्षकाळात पीचवर टिकणे महत्त्वाचे : सचिन जाधव

## विद्यापीठात 'तेंडल्या' चित्रपटाच्या स्क्रीनिंगला उत्स्फूर्त प्रतिसाद

कोल्हापूर : हॅलो प्रभात

स्वप्नांच्या मागे धावताना संघर्ष काळात अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्याला धीराने सामोरे जावे लागते. या काळात सचिन तेंडुलकरसारखे पीचवर टिकून राहणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन 'तेंडल्या' चित्रपटाचे दिग्दर्शक सचिन जाधव यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागाच्या बी. ए. फिल्ममेकिंग कोर्सच्या वतीने 'तेंडल्या' चित्रपटाचे स्क्रीनिंग करण्यात आले. यावेळी प्रेक्षकांशी त्यांनी संवाद साधला.

जाधव म्हणाले, चित्रपट निर्मिती हे टीम वर्क आहे. कथा सांगताना ती छोटी किंवा मोठी नसते, तर ती नीट अभिव्यक्त करणे



गरजेचे असते. त्यात सातत्य ठेवावे लागते. या प्रक्रियेत तुम्हाला धाडसाने काही निर्णय घ्यावे लागतात. मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी कार्यक्रमाचे स्वागत व प्रस्ताविक केले. याप्रसंगी चित्रपटातील कलाकारांचे स्वागत करण्यात आले. कोल्हापुरातील चित्रपट दिग्दर्शक उमेश बगाडे, मयूर कुलकर्णी, डॉ. संजय तोडकर, चित्रपट परीक्षक डॉ. अनमोल कोठाडीया, मराठी विभागाचे माजी प्रमुख आणि ज्येष्ठ लेखक प्रा. डॉ. राजन गवस, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे सचिव डॉ. शशिकांत चौधरी, प्रा. विकास कांबळे, राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख राजकीय विश्लेषक प्रा. डॉ. प्रकाश पवार, मतीन शेख, डॉ. जयंत कार्तिक, अभिनेता दिग्विजय रोहिदास, प्रमोद कुलकर्णी, जितेंद्र देशपांडे, गायिका रंजन कुलकर्णी, दिग्दर्शक संकपाळ, अभिनेता राज पाटील उपस्थित होते.

साक्षी वाघमोडे हिने सूत्रसंचालन केले. अनुप जत्राटकर यांनी आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील व विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 OCT 2024
तरुण भारत

# रोटरी क्लब इचलकरंजीतर्फे आदर्श शिक्षक नेशन बिल्डर ॲवॉर्ड जाहीर

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

येथील रोटरी क्लब ऑफ इचलकरंजीच्या वतीने प्रत्येक वर्षी शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्यात येतो. यावर्षीही पुरस्काराची परंपरा जोपासत क्लबने बालवाडी, प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन क्षेत्रात आदर्श शिक्षकांची निवड करून रोटरी इंटरनॅशनलचा 'मानाचा नेशन बिल्डर ॲवॉर्ड देण्यात येणार आहे. पुरस्कार वितरण बुधवार २३ रोजी सायंकाळी ६ वाजता सोनीदेवी बाहेती सेवा केंद्र, दाते मळा येथे शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, यांच्या हस्ते व डिस्ट्रिक्ट लिटरसी प्रमोशन सेक्रेटरी डॉ. प्रशांत कांबळे, उपप्रांतपाल यतीराज भंडारा यांच्या उपस्थितीत होणार आहे.

यामध्ये बालवाडी विभागात निशा भारत दंडगे (श्रीमंत ना. बा. बालमंदिर), प्राथमिक विभागात आरती सुधीर पाटील (माई बाल विद्यामंदिर), संजय गजानन माळी (बाबुराव आवाडे, विद्यामंदिर क्रमांक ५१), माध्यमिक विभागामध्ये सुभाष कृष्णप्पा मगदूम (व्यंकटेश्वरा इंग्लिश स्कूल), अर्चना ज्ञानेश्वर दाभोळे (व्यंकटराव हायस्कूल), दीपक सुरेश अथने (आंतरभारती विद्यालय), पार्श्वनाथ आप्पासो पाटील (राजर्षी छत्रपती शाहू हायस्कूल), महाविद्यालय विभागात प्रा. डॉ. शहाजहान मेहबूब मणेर (प्राचार्य, दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स व कॉमर्स कॉलेज) यांची निवड केली आहे. या निवड समितीमध्ये रोटरी क्लबचे अध्यक्ष संतोष पाटील, सेक्रेटरी चंद्रकांत मगदूम, प्रोजेक्ट चेअरमन अजित कुरडे, शिवदास कितुरे, सुजित मगदूम यांनी सहभाग घेतला.

जनसंपर्क कक्ष
२१ OCT 2021
पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भाषा संशोधकांनी वास्तवाचे भान ठेवावे

## डॉ. माया पंडित-नारकर : संशोधन पद्धतीविषयी विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भाषेच्या संशोधकांनी पुस्तकांतील सत्य आणि तथ्यांची पारख करताना वास्तवाचे भान ठेवावे. समाजातील चुकीच्या घटनांवर भाष्य करण्याचे ज्ञान अवगत करावे. यासाठी समाज जाणिवाही टोकदार ठेवाव्यात, असे आवाहन हैदराबाद विद्यापीठाच्या माजी प्र. कुलगुरू डॉ. माया पंडित-नारकर यांनी केले. पीएम-उषा योजनेंतर्गत शिवाजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवन येथे संशोधन पद्धती या विषयावरील कार्यशाळेत त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. के. के. शर्मा होते.

प्रास्ताविक समन्वयक डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी केली. मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी संशोधकांकडून होत असलेल्या सामान्य चुकांविषयी माहिती दिली. आभार डॉ. ए. एम. सरवदे यांनी व्यक्त केले.

दुसऱ्या सत्रात पुणे विद्यापीठातील मराठीचे प्रा. डॉ. प्रभाकर देसाई यांनी नवउदारवाद याविषयी भाष्य करत समाजातील बदलांना अधोरेखित करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले.

तिसऱ्या सत्रात हिंदी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. एस. एस. सावंत यांनी संशोधकांनी वाचनातून वैचारिक प्रगल्भता वाढवण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. गीता दोडमणी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. प्रकाश मुंज, डॉ. सुखदेव एकल, मृणाल मोहिते यांनी करून दिला. आभार प्रकाश निकम यांनी मानले. कार्यशाळेसाठी इंग्रजी विभागप्रमुख डॉ. प्रभंजन माने, विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांचे सहकार्य लाभले. डॉ. रणधीर शिंदे, डॉ. सी. ए. लंगरे, डॉ. राजश्री बारवेकर, डॉ. एम. एस. वासवाणी, डॉ. सुवर्णा गावडे, डॉ. दीपक भादले, डॉ. संतोष कोळेकर, डॉ. सुरेंद्र उपरे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 OCT 2024
लोकमत

# 'वाचनाची सवय सुसंस्कृत बनवते'

कोल्हापूर : ग्रंथालय आणि वाचनाची सवय ही माणसाला सुसंस्कृत बनवते, असे प्रतिपादन प्रा. पी. डी. तोरस्कर यांनी केले.

यशवंतराव चव्हाण (केएमसी) कॉलेजमध्ये भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त 'वाचन प्रेरणा दिन व ग्रंथ प्रदर्शन' पार पडले. प्राचार्य डॉ. बी. एन. उलपे अध्यक्षस्थानी होते. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्याच्या मजकुराचे वाचन करण्यात आले. ग्रंथपाल प्रा. रवींद्र मांगले यांनी स्वागत केले. डॉ. संजय कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सचिन धुर्वे यांनी आभार मानले. यावेळी प्रा. संदीप गावित, डॉ. बी. एम. पाटील, प्रा. किरण भोसले, डॉ. जे. एम. शिवणकर, प्रा. विशाल वैराठ, प्रा. ज्योती तरोडे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 OCT 2024
सकाळ

# प्रा. एस. आर. पाटील यांचे निधन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. शिवाजी रघुनाथ तथा एस. आर. पाटील (वय ६९) यांचे आज दुपारी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, तीन मुलगे, सुना, नातवंडे असा परिवार आहे. मूळचे सांगलीवाडी (जि. सांगली) येथील असणारे प्रा. पाटील सध्या मोरेवाडी परिसरात राहत होते. विद्यापीठातून २०१७-१८ मध्ये निवृत्त झाल्यानंतर ते संजय घोडावत युनिव्हर्सिटी येथे कार्यरत होते. डॉ. पाटील हे फिजिकल केमिस्ट्रीचे प्राध्यापक होते. फ्लोरोसन्स मटेरियल त्यांच्या संशोधनाचा विषय होता.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 OCT 2024
सकाळ

# श्रेया बरालेला तायक्वाँदोत 'सुवर्ण'


श्रेया बराले

**वडणगे :** विवेकानंद कॉलेजची खेळाडू श्रेया विश्वास बराले (रा. वडणगे) (बी.ए. भाग २) हिने १६ व १७ ऑक्टोबर रोजी जी.के.जी. कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय तायक्वाँदो स्पर्धेत ४६ किलो वजनीगटात सुवर्णपदक पटकावले. श्रेयाची १२ ते १४ नोव्हेंबरदरम्यान अमृतसर (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ तायक्वाँदो स्पर्धेसाठी निवड झाली. तिला संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रशिक्षक पद्माकर कांबळे, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, रजिस्ट्रार जोग व सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.